ePaper

# मुंबईकरांची लाही लाही, आणखी दोन दिवस उष्म्याचा ताप



|| वर्ष - 7 | अंक - 328 || UDYAM-MH-26-0158827 ||

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 18 एप्रिल 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत

- गुकेश-नेपोम्निया लढत बरोबरीत
- क्रिती खरबंदाच्या व्हिडीओची चर्चा
- आम्ही जाहीर माफी मागण्यासाठी तयार
- ईव्हीएमशी छेडछाड केल्यास शिक्षा?

## मावळ लोकसभा मतदार संघात

# चिंचवड, पनवेलकर 'किंगमेकर'!

### » दोन्ही मतदारसंघांत तब्बल 11 लाख 61 हजार 323 मतदार

। पिंपरी। महाईन्यूज

**पुणे आणि रायगड या दोन जिल्ह्यांत विभागलेल्या मावळ लोकसभा मतदारसंघात २५ लाख नऊ हजार ४६१ मतदार आहेत. त्यापैकी चिंचवड विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक पाच लाख ९५ हजार ४०८ तर पनवलेमध्ये पाच लाख ६५ हजार ९१५ मतदार आहेत. या दोन्ही मतदारसंघांत ११ लाख ६१ हजार ३२३ मतदार आहेत. निवडणुकीत दोन्ही विधानसभा मतदारसंघांतील मतदार निर्णायक ठरणार असून मावळचा खासदार ठरविणार आहेत.**




मावळ मतदारसंघातील पिंपरीत तीन लाख ६४ हजार ८०६, चिंचवडमध्ये सर्वाधिक पाच लाख ९५ हजार ४०८, मावळमध्ये तीन लाख ६९ हजार ५३४ तर पनवेलमध्ये पाच लाख ६५ हजार ९१५, कर्जत तीन लाख चार ५२३ आणि उरणमध्ये तीन लाख नऊ हजार २७५ असे २५ लाख नऊ हजार ४६१ मतदार आहेत. त्यात पिंपरी, चिंचवड, मावळमधील १३ लाख २९ हजार ७४८ तर पनवेल, कर्जत, उरणमधील ११ लाख ७९ हजार ७१३ मतदार असून, पुणे जिल्ह्यातील तिन्ही विधानसभा मतदारसंघात एक लाख ५० हजार जास्त मतदार आहेत.

तसेच, १३ लाख १० हजार ४३४ पुरुष तर ११ लाख ९८ हजार ८६८ महिला आणि इतर १५९ असे २५ लाख नऊ हजार ४६१ मतदार आहेत.

२४ हजार २७८ नवमतदार असून ८५ पेक्षा जास्त वय असणारे २२ हजार ३८० तर शंभरपेक्षा जास्त वय असणारे एक हजार ३५८ मतदार आहेत. दोन हजार ५६२ मतदान केंद्र आहेत. त्यात शहरी एक हजार ६९१ तर ग्रामीण भागात ८७१ केंद्र आहेत.

> निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी १८ हजार कर्मचारी कार्यरत आहेत. आचारसंहिता भंगाच्या ५० तक्रारी निकाली काढल्या आहेत. मतदारांना उन्हात उभे राहू लागू नये यासाठी मंडप टाकण्यात येणार आहे. पाण्याची सोय केली जाणार आहे. ज्येष्ठ नागरिक, गरोदर माता, दिव्यांग नागरिकांना प्राधान्याने मतदान केंद्रात घेतले जाईल. पारदर्शकपणे निवडणूक प्रक्रिया पार पाडली जाईल.
>
> - दीपक सिंग, निवडणूक निर्णय अधिकारी.

# पावणेचार लाखांच्या मताधिक्याने मावळ जिंकू!

### » संजोग वाघेरे पाटील यांचा विश्वास : 23 एप्रिलला उमेदवारी अर्ज भरणार!

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गेल्या दहा वर्षे मावळ लोकसभेचे खासदार असतानाही त्यांना मतदारसंघात एकही नवीन प्रकल्प आणला नाही. मतदारसंघातील अनेक प्रश्न जैसे थे आहेत. देशात कामगार कायदे बदलून त्यांना देशोधडीस लावले आहे. महागाई आणि बेरोजगारी वाढली आहे. यावरून प्रचारादरम्यान लोकांकडून प्रचंड चीड व्यक्त होते. मतदार माझ्या व महाविकास आघाडीच्या पाठिशी उभा राहणार असून आपला पावणेचार लाखांच्या मताधिक्याने विजयी होईल, असा विश्वास महाविकास आघाडी आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी बुधवारी (दि.17) पत्रकार परिषदेत व्यक्त केला.**



महाविकास आघाडीतर्फे आकुर्डी येथे झालेल्या पत्रकार परिषदेस शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार ॲड. गौतम चाबुकस्वार, शहरप्रमुख ॲड. सचिन भोसले, महिला संघटीका अनिता तुतारे, सुशीला पवार, काँग्रेसचे शहराध्यक्ष कैलास कदम, महिला शहराध्यक्ष सायली नढे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला शहराध्यक्षा ज्योती निंबाळकर, आपच्या शहराध्यक्षा मीना जावळे, पदवीधर आघाडीचे प्रदेशाध्यक्ष चेतन बेंद्रे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे, माजी नगरसेवक मारूती भापकर, प्रचारप्रमुख योगेश बाबर यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. संजोग वाघेरे पाटील म्हणाले की, येत्या मंगळवारी (दि.23) मावळ लोकसभेच्या जागेसाठी महाविकास आघाडीतर्फे उमेदवारी अर्ज भरणार आहे.

## खासदारांकडून अहंकारातून उलटसुलट वक्तव्ये

» विद्यमान खासदार अहंकारातून उलटसुलट वक्तव्य करीत आहेत. ही निवडणूक नातेगोत्यांची नाही. महापुरूषांच्या फोटोची मला गरज नाही. मी बीडला जन्मलेला नाही, अशी बडबड ते करीत आहेत. त्यामुळे मी त्यांना विनम्रपणे रावणाप्रमाणे अहंकार चढला असल्याची टीका केली होती. वावगे काही बोललो, असे वाघेरे म्हणाले. पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासात योगदान दिले. मी आणि माझे वडिलांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेत महापौर म्हणून काम केले. माझी पत्नी गेली पंधरा वर्षे नगरसेविका आहे. त्यामुळे त्यांना माझ्याबद्दल माहिती नसेल, तर विद्यमान खासदारांचा अभ्यास कमी असल्याचा टोला त्यांनी यावेळी लगावला.

# ‘मनसे’चा ताकदीने मोहोळांचा प्रचार!

## अमित ठाकरे यांचा विश्वास: मोहोळ यांनी घेतली सदिच्छा भेट

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधानपदी विराजमान करण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे यांनी महायुतीला पाठिंबा देण्याची भूमिका घेतल्यानंतर आता प्रत्यक्ष प्रचाराच्या हालचालींनाही वेग आला आहे. पुणे लोकसभेसाठी भाजपा उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारासाठी मनसे सक्रीय होणार आहे.**




यासंदर्भात मोहोळ यांनी मनसे नेते अमित ठाकरे यांची भेट घेतली असून ‘पुण्यातही मनसेचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते पूर्ण ताकदीने आणि जोमाने मुरलीधर मोहोळ यांच्या पाठीशी उभे राहतील, प्रचारात सक्रिय होतील,’ असा विश्वास मनसेचे नेते अमित ठाकरे यांनी मोहोळ यांना दिला.मनसे नेते अमित ठाकरे पुणे दौऱ्यावर असताना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पुणे शहर कार्यालयात महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी त्यांची सदिच्छा भेट घेतली. त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतल्याबद्दल मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे आभार मानले. याप्रसंगी मोहोळ यांना शुभेच्छा देत अमित ठाकरे यांनीही मनसेची संपूर्ण पुणे शहर संघटना आपल्या प्रचारात सक्रिय असेल, असा विश्वास दिला. यावेळी मनसेच्या वतीने ठाकरे यांनी मोहोळ यांचा सत्कार केला. या भेटीनंतर मोहोळ आणि मनसेचे सरचिटणीस बाबू वागसकर यांनी संयुक्तरित्या प्रसारमाध्यमांशी संवाद साधला.

या वेळी मनसेचे नेते बाबू वागसकर, सरचिटणीस रणजीत शिरोळे, सरचिटणीस बाळा शेडगे, सरचिटणीस अजय शिंदे, शहराध्यक्ष साईनाथ बाबर यांच्यासह भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष राजेश पांडे, शहराध्यक्ष धीरज घाटे, हेमंत रासने आदी पदाधिकारी उपस्थित होते.या भेटीबाबत माहिती देताना मोहोळ म्हणाले, ‘मनसेचे नेते अमितजी ठाकरे आज पुणे दौऱ्यावर असताना मी त्यांची सदिच्छा भेट घेतली. त्यावेळी त्यांनी मनसेचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते महायुतीचे मताधिक्य वाढवण्यास मोठा हातभार लावतील, असा शब्द दिला. त्यांच्याशी प्रचाराच्या रणनीतीबाबतही चर्चा झाली. त्यामुळे आमचा आत्मविश्वास अधिक वाढला आहे. विजय आणखी सोपा झाला आहे. राजसाहेबांना मानणारा एक मोठा वर्ग आणि मनसेची स्वतंत्र ताकद संपूर्ण पुणे शहरात आहे. त्यामुळे महायुतीची ताकद वाढली आहे. साहजिकच आम्ही सर्वच पक्ष एकदिलाने काम करून मोठा विजय साकारू’.

### एकदिलाने त्यांच्या प्रचारात सहभागी

» मनसे सरचिटणीस वागसकर म्हणाले, ‘महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष माननीय राजसाहेब ठाकरे यांनी नुकताच महायुतीला पाठिंबा देण्याचा निर्णय जाहीर केला आहे. त्यानुसार आमचे नेते अमितजी ठाकरे सर्वच शहरांत जाऊन पदाधिकाऱ्यांशी चर्चा करत आहेत. त्यांनी आज पुण्यातही आमच्या सर्व पदाधिकाऱ्यांशी, सर्व संघटकांशी चर्चा केली. त्यांनी आम्हा सर्वांना सोबत घेऊन, सन्मानाने वागणूक देऊन महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांचा प्रचार करण्यास सांगितले आहे. त्यानुसार आम्ही एकदिलाने त्यांच्या प्रचारात सहभागी होणार आहोत’.

# ...तर आज शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रू दिसले नसते!

## शिरूरचं वातावरण तापलं : मोहिते पाटलांची पवारांवर जहरी टिका

।राजगुरूनगर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादीत फुट पडल्यानंतर शिरूरमध्ये पहिल्यांदाच दोन्ही पवारांमध्ये हाय व्होल्टेच सामना बघायला मिळत आहे. अजित पवारांकडून माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील तर शरद पवारांकडून अमोल कोल्हे निवडणुकीच्या रिंगणात आहेत. आता दोन्ही बाजूच्या गटाकडून एकमेकांवर जोरदार टिका टिप्पणी केली जात असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सध्या शिरूरमध्ये राजकीय वातावरण चांगलचं तापलेलं दिसून येत आहे.**





अजितदादा गटातील आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी शरद पवार यांच्यावर जोरदार घणाघात केला आहे. कांद्याचे, दुधाचे दर कोसळण्याला थेट शरद पवारांना जबाबदार धरलं आहे. शरद पवारांनी केंद्रीय कृषी मंत्री असताना एक कायदा केला असता तर आज शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रू दिसले नसते. अशी घणाघाती टिका मोहिते पाटलांनी शरद पवारांवर केलीय.

दरम्यान, कांदा निर्यात करायच्या वेळी निर्यात बंदी करण्यात आली. असं तुमचं सरकार करत असेल तर तुम्ही झोपा काढत होता का ? असा सवाल जयंत पाटलांनी मोहिते पाटलांना केलाय. तर मोहिते सत्तेत जाण्यासाठी कसे लाचार झालेत आणि ते कसे महागद्दार आहे. हे सांगताना कोल्हेंनी गेल्या दहा वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकरी विरोधी भूमिका कशा घेतल्या. याचा पाढाच वाचला. यावेळी दिलीप मोहिते पाटील म्हणाले की, शरद पवार कृषीमंत्री होते. तेव्हा त्यांनी एक कायदा केला असता तर आज शेतकऱ्यांची ही अवस्था झाली नसती. तुम्ही कधीही लोकप्रतिनिधी म्हणून आमच्यासोबत बसून चर्चा केली नाही. आज ती चर्चा केली असती तर शेतकरी चांगलाच सुखावला असता. त्यावर देशात कृषी खात्यामध्ये फार पुढे गेला आहे. देश निर्यातीपर्यंत पोहोचला आहे. नंतर शिरूरमध्ये पहिल्यांदाच दोन्ही पवारांमध्ये हाय व्होल्टेच सामना बघायला मिळत आहे. अजित पवारांकडून माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील तर शरद पवारांकडून अमोल कोल्हे निवडणुकीच्या रिंगणात आहेत. आता दोन्ही बाजूच्या गटाकडून एकमेकांवर जोरदार टिका टिप्पणी केली जात असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सध्या शिरूरमध्ये राजकीय वातावरण चांगलचं

### काय म्हणाले दिलीप मोहिते-पाटील..?

» यावेळी दिलीप मोहिते पाटील म्हणाले की, शरद पवार कृषीमंत्री होते. तेव्हा त्यांनी एक कायदा केला असता तर आज शेतकऱ्यांची ही अवस्था झाली नसती. तुम्ही कधीही लोकप्रतिनिधी म्हणून आमच्यासोबत बसून चर्चा केली नाही. आज ती चर्चा केली असती तर शेतकरी चांगलाच सुखावला असता. त्यावर देशात कृषी खात्यामध्ये फार पुढे गेला आहे. देश निर्यातीपर्यंत पोहोचला आहे.

### शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रू दिसले

» अजित पवारांकडून माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील तर शरद पवारांकडून अमोल कोल्हे निवडणुकीच्या रिंगणात आहेत. आता दोन्ही बाजूच्या गटाकडून एकमेकांवर जोरदार टिका टिप्पणी केली जात असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सध्या शिरूरमध्ये राजकीय वातावरण चांगलचं तापलेलं दिसून येत आहे. अजितदादा गटातील आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी शरद पवार यांच्यावर जोरदार घणाघात केला आहे. कांद्याचे, दुधाचे दर कोसळण्याला थेट शरद पवारांना जबाबदार धरलं आहे. शरद पवारांनी केंद्रीय कृषी मंत्री असताना एक कायदा केला असता तर आज शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रू दिसले नसते. अशी घणाघाती टिका मोहिते पाटलांनी शरद पवारांवर केलीय.

## राष्ट्रवादीच्या राजकीय कारस्थानामुळे दुखावले;

# नितीन लांडगे प्रचारापासून दुरावले!

## शिरूरमध्ये अजित पवार अन् आढळराव पाटलांना फटका

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची रंगत वाढली असली तरी, शिरूर लोकसभा मतदार संघातील 'निर्णायक' असलेला भोसरी विधानसभा मतदार संघातील महायुतीचे 'गणित' अद्याप जुळलेले नाही. विशेष म्हणजे, भोसरी-पिंपरी-चिंचवडसह हवेली तालुक्यातील राजकारणातील मातब्बर घराणे माजी आमदार ज्ञानेश्वर लांडगे आणि त्यांचे राजकीय वारसदार माजी स्थायी समिती सभापती अ‍ॅड. नितीन लांडगे या निवडणुकीत राष्ट्रवादीचा प्रचार करतील काय? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.**













ज्ञानेश्वर लांडगे हे पिंपरी-चिंचवडचे पहिले महापौर. त्यांनी काँग्रेसकडून आमदारपदही भूषवले आहे. पूर्वीच्या हवेली मतदारसंघातून ते निवडून आले होते. शहराच्या राजकारणातील आदरणीय व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांना ओळखले जाते. शिक्षण क्षेत्रात नर्सरी ते इंजिनिअरिंग कॉलेज अशा नऊ शैक्षणिक संस्था असलेल्या पिंपरी एज्युकेशन ट्रस्टचेते अध्यक्ष आहेत. पवना सहकारी बँकेचेही अध्यक्ष असून, ४५ वर्षापासून ते या बँकेशी निगडित आहेत. त्यांचा राजकीय वारसा पुत्र अ‍ॅड. नितीन लांडगे हे पुढे चालवीत आहेत. पूर्वी राष्ट्रवादीत असलेले अ‍ॅड. नितीन लांडगे यांनी भोसरीतील भाजपाचे विद्यमान आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्त्वात महापालिका निवडणुकीची (2017) भाजपात जाहीरपणे प्रवेश केला. महापालिकेत सत्ता आल्यानंतर भाजपाच्या माध्यमातून अ‍ॅड. लांडगे यांना स्थायी समिती सभापतीपदी संधी देण्यात आली. त्या काळात राज्यात महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाले होते. दरम्यान, स्थायी समितीच्या कार्यालयाबाहेर लाचप्रकरणी कारवाई करण्यात आली. या प्रकरणात अ‍ॅड. लांडगे यांच्यावर प्रचंड आरोप झाले. तत्कालीन राज्यातील सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आणि स्थानिक नेत्यांनी या मुद्याचे राजकीय भांडवल केले. पिंपरी-चिंचवडमधील मातब्बर राजकीय व सामाजिक क्षेत्रातील घराणे असलेल्या लांडगे कुटुंबियांवर झालेले आरोप, अ‍ॅड. नितीन लांडगे यांना झालेली अटक आणि मिळालेली पोलीस कोठडी तसेच राष्ट्रवादीने उचललेला संधीचा फायदा... या सर्व बाबी ज्ञानेश्वर लांडगे कुटुंबियांच्या जिव्हारी लागल्या आहेत.

### ज्ञानेश्वर लांडगे कुटुंबीय तटस्थ राहणार...

» लाच प्रकरणात राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांनी केलेला संधीसाधुपणा अ‍ॅड. नितीन लांडगे आणि कुटुंबीय विसरणार नाहीत. पिंपरी-चिंचवडसह पंचक्रोशीमध्ये व्रतस्थ व्यक्तीमत्व म्हणून माजी आमदार ज्ञानेश्वर लांडगे यांचा उल्लेख केला जातो. सुमारे ५० वर्षे सामाजिक व राजकीय क्षेत्रातील ही 'लीगसी' लांडगे कुटुंबीयांनी जपली. पण, महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांच्या आततायीपणामुळे याला गालबोट लागले. अजित पवार यांच्या राष्ट्रवादीतील स्थानिक पदाधिकाऱ्यांनी ठेकेदाराशी संगनमत करुन ' कथित लाच प्रकरण' चव्हाट्यावर आणले. त्यामुळे भोसरीसह पिंपरी-चिंचवडमधील लांडगे कुटुंबियांशी आत्मियता असलेला वर्ग नाराज झाला होता. मोठ्या शिक्षण संस्था आणि पवना बँकेच्या माध्यमातून तसेच नातेगोत्यामुळे भोसरी, खेडसह ग्रामीण भागात लांडगे यांचा मोठा जनसंपर्क आहे. त्यामुळे भोसरीसह शिरुर लोकसभा मतदार संघातील राजकारणात ज्ञानेश्वर लांडगे कुटुंबियांची भूमिका 'निर्णायक' ठरणार आहे. लांडगे कुटुंब या निवडणुकीत राष्ट्रवादीपासून अलिप्त राहिल्यास महायुतीला फटका बसणार आहे.

### शरद पवार- ज्ञानेश्वर लांडगे यांची भेट होणार...

» राज्यातील राजकारणात अजित पवार आणि भाजपाचा बंदोबस्त करण्यासाठी मैदानात उतरलेले मातब्बर नेते शरद पवार यांनी अजित पवार यांच्या विरोधकांची मोट बांधण्याची रणनिती आखली आहे. शिरुर लोकसभा मतदार संघात विद्यमान खासदार अमोल कोल्हे यांनी शरद पवार यांची साथ दिली आहे. त्यामुळे शिरुरमध्ये 'तुतारी'चा विजयी निनाद करण्यासाठी शरद पवार आपले पत्ते उघडणार आहेत. आगामी आठवडाभरात शरद पवार हे स्वत: माजी आमदार ज्ञानेश्वर लांडगे यांच्या भेटीसाठी भोसरीत येणार आहेत. शिरुरच्या विजयासाठी भोसरीतून आगेकूच करण्याचा निर्धार करण्यात आला आहे, असे शरद पवार गटातील विश्वसनीय सूत्रांकडून समजले आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव यांच्या अडचणींमध्ये भर पडणार आहे.

# राम मंदिर उभारणीमुळे देशात नवचैतन्य!

## खासदार बारणे : शहरातील रामभक्तांशी साधला संवाद

। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**श्रीराम नवमीनिमित्त शहरातील विविध राम मंदिरांमध्ये जाऊन मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी- मनसे- आरपीआय-रासप मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी प्रभू रामचंद्रांचे दर्शन घेतले तसेच काम भक्तांशी संवाद साधला. सुमारे पाचशे वर्षांच्या संघर्षानंतर अयोध्येतील राम जन्मभूमी मंदिर उभारणीमुळे देशात नवचैतन्य निर्माण झाल्याच्या भावना बारणे यांनी यावेळी व्यक्त केल्या.**



खासदार बारणे यांनी रामनवमी निमित्त मावळ तालुक्यातील नवलाख उंब्रे येथील प्राचीन स्वयंभू राम मंदिर, थेरगाव येथील श्रीराम-जानकी मंदिर, रहाटणी, चिंचवड व प्राधिकरण पेठ क्रमांक 27 येथील राम मंदिरांत जाऊन प्रभू रामचंद्रांचे दर्शन घेतले. त्यावेळी त्यांच्या समवेत तानाजी बारणे, मयूर बारणे, दीपक गुजर, गौरव जाधव, भरत जाधव, प्रदीप दळवी, अंकुश कोळेकर आदी कार्यकर्ते होते.

थेरगाव येथील श्रीराम-जानकी मंदिरात अध्यक्ष गुलाब तिवारी व पुजारी सभाशंकर तिवारी यांनी खासदार बारणे यांचे स्वागत व सत्कार केला. रहाटणी येथे अंकुशराव राजवडे, अजय कदम, आदेश राजवडे यांनी बारणे यांना श्रीरामाचा प्रसाद देऊन निवडणुकीसाठी शुभेच्छा दिल्या. चिंचवड गावातील राम मंदिरात मुख्य विश्वस्त श्रीकांत देव तसेच पुजारी नितीन राजर्षी व कौस्तुभ रबडे यांनी बारणे यांचे स्वागत व सत्कार केला. त्यावेळी माजी नगरसेविका अश्विनी चिंचवडेही उपस्थित होत्या. निगडी प्राधिकरण पेठ क्र. 27 येथे श्रीराम सेवा मंडळाच्या वतीने सागर दिवाकर व लक्ष्मीशेठ अग्रवाल यांनी बारणे यांचे स्वागत केले.

ठिकठिकाणी बारणे यांनी रामभक्तांशी संवाद साधला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अयध्येत राम मंदिर उभारणीचा दिलेला शब्द पाळला आहे. हे केवळ राम मंदिरच नाही तर राष्ट्र मंदिर आहे. प्रभू श्रीराम हे भारतीय अस्मितेचे प्रतीक आहे.

अयोध्येत भव्य राम मंदिर उभे राहिल्यामुळे संपूर्ण देशात नवचैतन्य निर्माण झाले असून नव्या आत्मविश्वासाने देश पुढील प्रगती करणार आहे, असे बारणे म्हणाले.

### रामनगरमध्ये महाप्रसाद वाटप

» चिंचवड रामनगर येथील श्रीराम सेवा ट्रस्ट आयोजित रामजन्मोत्सवात सहभागी होऊन खासदार बारणे यांनी स्वतःच्या हातांनी रामभक्तांच्या पंगतीला महाप्रसादाचे वाटप केले. कार्यक्रमाचे मुख्य संयोजक अमर दौंडकर व राहुल दौंडकर व अन्य पदाधिकाऱ्यांना खासदार बारणे यांचे स्वागत व सत्कार केला. देहूरोड येथील वैश्य समाज मंदिरातील श्रीराम जन्मोत्सवास खासदार बारणे उपस्थित होते. विशाल खंडेलवाल, सुरेश बन्सल, सुमित जिंदल, सुनील गोयल, अमित बन्सल, अमित शर्मा, आशिष बन्सल, राहुल गोयल आदींनी त्यांचे स्वागत केले. बारणे यांना श्रीरामरायाचा प्रसाद देऊन निवडणुकीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.



भूमिका

# पुन्हा कान टोचले; आता तरी सुधारा !

**पर्यावरण रक्षणाचे नियम, कायदे तयार करायचे व उद्योगलालसा जागृत झाली की त्याला मोडता घालायचा ही सगळ्याच सरकारांची सवय. पण या वृत्तीमुळे अंतिमत: नुकसान होते ते पर्यावरणाचे. या पार्श्वभूमीवर कोकणातील सावंतवाडी व दोडामार्ग परिसरातील २५ गावे संवेदनशील क्षेत्र म्हणून घोषित करावी.**

यासाठी स्थानिक तसेच स्वयंसेवी संस्थांनी सुरू केलेले प्रयत्न उच्च न्यायालयाच्या नव्या निर्देशामुळे यशस्वी ठरले. आता ही गावे अधिसूचित करण्याशिवाय केंद्र सरकारकडे कोणताही पर्याय शिल्लक राहिलेला नसला तरी या लढ्यातून जुनेच प्रश्न नव्याने समोर आले आहेत.व्याघ्र प्रकल्प, अभयारण्ये व राखीव वनक्षेत्राच्या सीमेलगतचा दहा चौरस किलोमीटर क्षेत्रातील परिसर संवेदनशील क्षेत्र म्हणून घोषित करावा ही संकल्पना तशी जुनीच. हेतू हाच की राखीव जंगल व त्यात राहणाऱ्या वन्यजीवांना तसेच जैवविविधतेला बाधा पोहोचू नये; वन्यजीवांचा वावर असलेला कॉरिडॉर सुरक्षित राहावा. १९८६ च्या पर्यावरण रक्षण कायद्यात संवेदनशील क्षेत्र या तरतुदीचा उल्लेख नव्हता. पण विकासाच्या नावावर अशा जंगलांलगत अनेक नवे प्रकल्प येऊ लागताच सरकारने ही तरतूद करून घेऊन ती अमलात आणणे सुरू केले. सुरुवातीला संवेदनशील क्षेत्र निश्चित करताना त्यात समाविष्ट असणाऱ्या गावांना



येणाऱ्या अडचणीचा विचार केला गेला नाही. त्यामुळे हा मुद्दा पुन्हा सर्वोच्च न्यायालयात गेला. २०२२ मध्ये न्यायालयाने खाणकाम सोडून इतर लहान-मोठ्या बांधकामांना या क्षेत्रात परवानगी असेल असा निकाल दिला. यामुळे संवेदनशील क्षेत्र म्हणजे विकास ठप्प हा गैरसमज दूर होण्यास मदत झाली. पर्यटनाविषयीचा संभ्रमही दूर झाला. आजवर जंगल राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या गावांना यामुळे दिलासा मिळाला. मात्र सरकारी पातळीवर वेगळेच उद्योग सुरू झाले.जंगलाखाली भरपूर खनिजसंपत्ती दडलेली आहे तिथे अशी क्षेत्रे अधिसूचित करायची नाहीत; लोक अथवा स्वयंसेवी संस्थांकडून फारच दबाव वाढला तर हरकती व सूचना मागवण्याचे नाटक करायचे व प्रकरण रेंगाळत राहील याची काळजी घ्यायची; या दरम्यान याच भागात खाणकामाला परवानगी द्यायची, हे ते उद्योग. कोकणात हेच घडले. ताडोबा व्याघ्र प्रकल्पाच्या लगत अदानी व अन्य उद्योगांना खाणींची परवानगी देतानाही सरकारने हीच चलाखी अवलंबली. आजघडीला पश्चिम घाटाइतकेच महत्त्वाचे जंगल गडचिरोलीत आहे. तरीही केवळ खनिजे आहेत म्हणून या क्षेत्राला संवेदनशील दर्जा देण्यात आला नाही. कोकणासंदर्भातला निकाल सरकारची ही लबाडी उघड करणारा आहे. त्यातला दुसरा मुद्दा घोषित संवेदनशील क्षेत्राच्या रचनेत बदल करण्याच्या, ते कमी-जास्त करण्याच्या सरकारच्या अधिकारासंदर्भात आहे. माळढोकांच्या अस्तित्वामुळे अधिसूचित झालेल्या नान्नजमध्ये सरकारने तो वापरला. देशात इतरत्रही तसेच घडले. हे प्रकार थांबायला हवेत यासाठी लोकलढे उभारण्याची गरज सावंतवाडी-दोडामार्गसंदर्भातील निकालाने अधोरेखित केली आहे.

एकदा संवेदनशील क्षेत्र घोषित झाले की सर्व प्रकारच्या विकासकामांवर निर्बंध येतात ही सार्वत्रिक समजूत हा यातला तिसरा व कळीचा मुद्दा. या तरतुदींच्या अंमलबजावणीला चार दशके लोटली तरीही सरकारला यासंदर्भातील मार्गदर्शक सूचना त्यात राहणाऱ्या लोकांना पटवून देता आल्या नाहीत. पर्यावरणपूरक विकासाचे प्रारूप तयार करता आले नाही. यासाठी आवश्यक लोकसहभाग वाढवता आला नाही. परिणामी असे क्षेत्र म्हणजे बंधनाचा जाच अशीच लोकांची समजूत होत गेली व त्यातून नियमभंगाच्या घटनांमध्ये वाढ होत गेली. या पार्श्वभूमीवर कोकणचा लढा उल्लेखनीय ठरतो. विकास अथवा प्रगतीसाठी खाणकाम हवेच. खनिजांचे उत्खननही हवे. मात्र जंगलाखाली दडलेली खनिजे कशी बाहेर काढायची? त्यासाठी कोणती पद्धत वापरायची? ती वापरताना पर्यावरणाचा नाश होणार नाही यासाठी कोणते तंत्रज्ञान वापरायचे? विकसित देशांनी यासंदर्भात कोणते प्रयोग केले आहेत? यापैकी एकाही प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न सरकारने कधी केला नाही. जागतिक पातळीवर नाचक्की होऊ नये म्हणून पर्यावरण रक्षणाचे कायदे करायचे व उद्योगस्नेही धोरण राबवताना त्यांनाच फाटा द्यायचा असेच प्रत्येक सरकारचे धोरण राहिले.

## संपादकीय »

# मिरवण्याच्या मर्यादा!

***इराणच्या हल्ल्याला त्वेषाने उत्तर द्यावे तर अमेरिकेचा मोडता आणि न द्यावे तर नाकर्तेपणाचा अपमान अशा कात्रीत पंतप्रधान नेतान्याहू सापडलेले दिसतात..***

एकदा कोणतीही गोष्ट मिरवायचीच असा निर्धार केला की ज्यामुळे प्रत्यक्षात अब्रू गेली ती बाबही अभिमानाने मिरवता येते. शत्रूस कसे परतवून लावले हे सत्य डामडौलात मिरवणारे प्रत्यक्षात मुळात शत्रू आतपर्यंत आला होता हे सत्य लपवण्याचा प्रयत्न करत असतात. घरात घुसलेल्या शत्रुसैन्याचा कसा खात्मा केला ही बाब वाजत-गाजत साजरी करणारे मुळात शत्रूने घरात घुसून आपणास गाफील पकडले ही बाब दडवू पाहत असतात. सामान्य जनता असले 'विजय' साजरे करण्याच्या देखाव्यास भुलते आणि टाळ्या वाजवत सहभागी होते. इस्रायलसंदर्भात ही बाब सध्या दिसून येईल. त्या देशावर पारंपरिक शत्रू अशा इराण या देशाने भल्या पहाटे अनेक हल्ले केले. ड्रोन आणि क्षेपणास्त्रांच्या रूपाने ही मारगिरी झाली. अधिकृत आकडेवारीनुसार भल्या पहाटे एका तासभरात साधारण २०० हल्ले झाले.

**जानेवारी २०२४ पासून एप्रिलच्या मध्यापर्यंत म्हणजे गेल्या साडेतीन महिन्यांत अमेरिकेत गेलेले ११ भारतीय विद्यार्थी विविध घटनांत मृत्युमुखी पडले. अगदी नुकतीच गेल्या शुक्रवारीदेखील कॅनडामध्ये एका भारतीय तरुणाची हत्या झाली. एखाद-दुसरा अपवाद वगळता इतर सर्व मृत्यूंचे कारण अजून अस्पष्ट आहे..**

# 'अमेरिकन ड्रीम' दु:स्वप्न का ठरत आहे?

परदेशात आणि त्यातूनही अमेरिकेत उच्च शिक्षणासाठी जाण्याची ओढ भारतीय विद्यार्थ्यांमध्ये सर्वाधिक आहे. २०२२-२३ मध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांची आकडेवारी ही या विधानाची निदर्शकच समजायला हवी. या वर्षांत तब्बल २ लाख ६८ हजार ९२३ भारतीय विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणासाठी अमेरिका गाठली. याच्या आदल्या शैक्षणिक वर्षाशी तुलना करता, ही वाढ ३५ टक्के इतकी होती. अमेरिकेत शिक्षणासाठी जाणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांची ही आतापर्यंतची सर्वाधिक संख्या आहे, असे 'ओपन डोअर्स' संस्थेचा अहवाल सांगतो. २०२२-२३ मध्ये अमेरिकेत आलेल्या १० लाख आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांपैकी अडीच लाखांहून अधिक म्हणजे २५ टक्के विद्यार्थी हे भारतीय आहेत, असेही ही आकडेवारी सांगते. आकडेवारीचे हे सगळे पुराण सांगण्याचे कारण असे, की या संख्यावाढीला येत्या शैक्षणिक वर्षांत लगाम लागतो की काय, असा



प्रश्न पडावा अशी स्थिती अमेरिकेत आहे. जागतिक अर्थव्यवस्थेची मंदावलेली गती आणि परिणामी अमेरिकेत पदव्युत्तर शिक्षण घेऊनही बेरोजगार राहणाऱ्यांची वाढलेली संख्या हे त्याचे एक कारण. दुसरे कारण अमेरिकेतील भारतीय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसंबंधी आहे आणि ते अधिक गंभीर आहे. पुन्हा आकडेवारीच्या भाषेत बोलायचे, तर १ जानेवारी २०२४ पासून एप्रिलच्या मध्यापर्यंत म्हणजे साडेतीन महिन्यांत ११ भारतीय विद्यार्थी विविध घटनांत मृत्युमुखी पडले आहेत. अगदी एखाद-दुसरा अपवाद वगळता इतर सर्व मृत्यूंचे कारण अजून अस्पष्ट आहे. अशा प्रकारचे हल्ले वाढले असून, त्यातील काहींची नोंदच न झाल्याची शंका आहे. विद्यार्थी समुदायामध्ये भीतीचे आणि साशंकतेचे वातावरण असल्याच्याही बातम्या आहेत. या सगळ्या पार्श्वभूमीवर, अमेरिकेत नेमके काय घडते आहे, हा प्रश्न यंदा किंवा पुढच्या वर्षी अमेरिकेत जाऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना सतावतो आहे.ही सगळी चर्चा घडण्यासाठी कारणीभूत ठरलेल्या घटना नेमक्या काय होत्या, याचा आढावा घेतला, तर या सगळ्या प्रकाराचे गांभीर्य आणखी नेमकेपणाने समोर येईल. आतापर्यंत झालेल्या घटनांतील अकराही विद्यार्थी पंचविशीच्या आतील आहेत. यात दोघांचा मृत्यू सुरक्षा उपायांची माहिती नसल्याने झाल्याचे समोर आले आहे, पण इतर मृत्यूंबाबत साशंकता आहे. अमेरिकेतील भारतीय विद्यार्थ्यांचे बहुतांश मृत्यू हे ओहियो, इलिनॉइस आणि इंडियाना या मध्य-पश्चिमेकडील राज्यांत घडले आहेत, हा या मृत्यूंमधील आणखी एक समान धागा आहे. त्यातील अगदी नुकतीच घडलेली घटना आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# द्रौपदीचा विचार करावा लागतो की काय?

## » मुलींच्या जन्मदरावर बोलताना अजित पवार काय बोलून गेले?

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज त्यांच्या भाषणात केलेल्या वक्तव्याची चर्चा चांगलीच रंगताना दिसते आहे. खरंतर अजित पवार हे मुलींच्या जन्मदराबाबत बोलत होते. मात्र त्यांनी द्रौपदीचं उदाहरण दिलं. त्यांना आपण काय बोलून गेलो हे लक्षात आल्यानंतर त्यांनी तातडीने हात जोडत मी विनोद केला गांभीर्याने घेऊ नका असंही सांगितलं. मात्र त्यांच्या या वक्तव्याची चर्चा मात्र सुरु झाली आहे.**



आम्ही मधल्या काळात पाहिलं, मुला-मुलींच्या जन्मदरात महाराष्ट्रातल्या काही जिल्ह्यांमध्ये इतकी तफावत होती की १ हजार मुलं जन्माला आल्यानंतर ८०० ते ८५० मुली जन्माला येत होत्या. काही वेळा हा जन्मदर ७९० इतकाही कमी झाला होता. मी म्हटलं की पुढे द्रौपदीचा विचार करावा लागतो की काय?, असा प्रसंग त्यावेळेस येईल." अजित पवारांनी हे वाक्य उच्चारलं आणि तातडीने म्हणाले, "यातला गंमतीचा भाग सोडून द्या, नाहीतर लगेच म्हणतील अजित पवारांनी द्रौपदीचा अपमान केला, मला कुणाचाही अपमान करायचा नाही." तसंच त्यांनी हातही जोडले. अजित पवार यांनी जरी हात जोडून वेळ मारुन नेली असली तरीही हे वाक्य चर्चेत आलं आहे. इंदापूरमध्ये डॉक्टर आणि वकिलांच्य मेळाव्यात बोलत असताना अजित पवारांनी हे वाक्य उच्चारलं आहे. द्रौपदी महाभारततली एक तेजस्वी स्त्री आणि राणी होती. तिचे पाच पती होते. त्याची कारणं वेगळी होती. महाभारतातलं एक महत्वाचं पात्र म्हणून द्रौपदीकडे पाहिलं जातं. मात्र अजित पवारांनी मुलींच्या जन्मदरावर भाष्य करत असताना 'द्रौपदीचा विचार करावा लागतो की काय?' हे म्हटल्याने उलटसुलट चर्चा सुरु झाल्या आहेत. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी अजित पवारांनी महिला वर्गाचा अपमान केला आहे असा आरोप जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. अजित पवारांच्या डोक्यात जे विष होतं ते बाहेर आलं आहे. ज्या काकांनी स्त्रियांना ५० टक्के आरक्षण देऊन महिलांना पुढे आणण्याचा प्रयत्न केला, महिलांना मुख्य धारेत आणण्याचा प्रयत्न केला. शिवाजी महाराजांनी कर्मकांडाला विरोध केला होता. महात्मा फुलेंनी स्त्रियांसाठी शिक्षणाचे दरवाजे उघडे केले. ज्या बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांना न्याय दिला त्यांच्याच महाराष्ट्रात एक माणूस स्त्रिया द्रौपदी झाल्या असत्या असं म्हणतात. द्रौपदीचा अर्थ काय होतो? त्यांनी जरा समजवून सांगावं आणि समस्त महिला वर्गाची माफी मागावी" असं जितेंद्र आव्हाड म्हणाले आहेत. आम्ही मधल्या काळात पाहिलं, मुला-मुलींच्या जन्मदरात महाराष्ट्रातल्या काही जिल्ह्यांमध्ये इतकी तफावत होती की १ हजार मुलं जन्माला आल्यानंतर ८०० ते ८५० मुली जन्माला येत होत्या. काही वेळा हा जन्मदर ७९० इतकाही कमी झाला होता. मी म्हटलं की पुढे द्रौपदीचा विचार करावा लागतो की काय?, असा प्रसंग त्यावेळेस येईल." अजित पवारांनी हे वाक्य उच्चारलं आणि तातडीने म्हणाले, "यातला गंमतीचा भाग सोडून द्या, नाहीतर लगेच म्हणतील अजित पवारांनी द्रौपदीचा अपमान केला, मला कुणाचाही अपमान करायचा नाही." तसंच त्यांनी हातही जोडले. अजित पवार यांनी जरी हात जोडून वेळ मारुन नेली असली

### काय म्हणाले जितेंद्र आव्हाड?

» तरीही हे वाक्य चर्चेत आलं आहे. इंदापूरमध्ये डॉक्टर आणि वकिलांच्य मेळाव्यात बोलत असताना अजित पवारांनी हे वाक्य उच्चारलं आहे.द्रौपदी महाभारततली एक तेजस्वी स्त्री आणि राणी होती. तिचे पाच पती होते. त्याची कारणं वेगळी होती. महाभारतातलं एक महत्वाचं पात्र म्हणून द्रौपदीकडे पाहिलं जातं. मात्र अजित पवारांनी मुलींच्या जन्मदरावर भाष्य करत असताना 'द्रौपदीचा विचार करावा लागतो की काय?' हे म्हटल्याने उलटसुलट चर्चा सुरु झाल्या आहेत. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी अजित पवारांनी महिला वर्गाचा अपमान केला आहे असा आरोप जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे.अजित पवारांच्या डोक्यात जे विष होतं ते बाहेर आलं आहे. ज्या काकांनी स्त्रियांना ५० टक्के आरक्षण देऊन महिलांना पुढे आणण्याचा प्रयत्न केला, महिलांना मुख्य धारेत आणण्याचा प्रयत्न केला. शिवाजी महाराजांनी कर्मकांडाला विरोध केला होता. महात्मा फुलेंनी स्त्रियांसाठी शिक्षणाचे दरवाजे उघडे केले. ज्या बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांना न्याय दिला त्यांच्याच महाराष्ट्रात एक माणूस स्त्रिया द्रौपदी झाल्या असत्या असं म्हणतात..

# विशाल पाटलांची गेल्या तीन वर्षांपासून मोर्चेबांधणी

## » विशाल पाटलांची बंडखोरी, सत्यजीत तांबेंचं भूमिकेला समर्थन

। नागपूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सांगलीच्या रक्तातच बंड आहे, ते यशस्वी करण्याची जबाबदारी तुम्हा सर्वांची आहे असे सांगत काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष विशाल पाटील यांनी महाविकास आघाडीला अप्रत्यक्ष इशारा दिला. तसंच, काँग्रेस उमेदवारी देईल अशी आशा व्यक्त केली असली तरीही त्यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.**




यावर विधान परिषदेचे आमदार सत्यजीत तांबे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.विशाल पाटलांवर काय अन्याय झालाय, हे फक्त त्यांचा संघर्ष माहित असलेल्यांनाच ठाऊक आहे. त्यांना हे पाऊल का उचलावे लागले ह्याचा विचार होणे गरजेचे आहे. राजकारणात कर्तृत्ववान युवक हवेत ह्या मताचा मी कार्यकर्ता आहे, असं सत्यजीत तांबे म्हणाले.वसंतदादा पाटलांचे ह्या महाराष्ट्रावर व आमच्या पिढीवर अनंत उपकार आहेत, विशेषतः त्यांनी केलेल्या शिक्षणाच्या क्रांतीमुळेच आज घराघरात डॉक्टर, इंजीनियर तयार होत आहेत. विशालदादा हे वसंतदादांच्या कामाचा वसा व वारसा पुढे घेऊन जाण्यात पूर्णपणे सक्षम आहेत. त्यामुळेच त्यांना संधी मिळणे आवश्यक आहे. अजूनही वेळ गेलेली नाही, विशालदादांना कुठेतरी संधी मिळायलाच हवी", असंही ते म्हणाले.वसंतदादा पाटलांचे ह्या महाराष्ट्रावर व आमच्या पिढीवर अनंत उपकार आहेत, विशेषतः त्यांनी केलेल्या शिक्षणाच्या क्रांतीमुळेच आज घराघरात डॉक्टर, इंजीनियर तयार होत आहेत. विशालदादा हे वसंतदादांच्या कामाचा वसा व वारसा पुढे घेऊन जाण्यात पूर्णपणे सक्षम आहेत. त्यामुळेच त्यांना संधी मिळणे आवश्यक आहे. अजूनही वेळ गेलेली नाही, विशालदादांना कुठेतरी संधी मिळायलाच हवी म्हणाले.सांगलीच्या जागेवर काँग्रेसचा नैसर्गिक अग्रहक्क असताना महाविकास आघाडीच्या जागा वाटपात सांगलीची जागा शिवसेना ठाकरे गटाला दिली गेली. शिवसेनेनेही चंद्रहार पाटील यांना पक्षात घेउन उमेदवारीही जाहीर केली. यानंतरच खऱ्या अर्थाने विशाल पाटील यांना उमेदवारीपासून वंचित ठेवण्यामागे काही शक्ती कार्यरत असल्याची चर्चा जोरदारपणे सुरू झाली.

### सांगलीच्या जागेवर काँग्रेसचा हक्क

» यात समझोता करण्याऐवजी शिवसेना नेते संजय राउत यांच्या बोलण्यांने आगीत तेल ओतण्याचेच काम केले. जुळू पाहणारे स्नेहबंध पुन्हा विस्कटले. आणि त्या चिडीतून विशाल पाटील यांच्यावर उमेदवारी दाखल करण्यासाठी दबाव आला. आताही त्यांनी काँग्रेसकडून उमेदवारी दाखल करत असताना अपक्ष म्हणूनही उमेदवारी दाखल केली आहे. जर शिवसेनेने जागा सोडलीच नाही, आणि काँग्रेसने मैत्रीपूर्ण लढतीला सहमती दर्शवली नाही तर मैदानात उतरायचेच या हेतूने अपक्ष उमेदवारी दाखल केली आहे. यामुळे सांगलीत कोणत्याही स्थितीत विशाल पाटील मैदानात असणार हे स्पष्ट आहे. सांगलीच्या रक्तातच बंड आहे, ते यशस्वी करण्याची जबाबदारी तुम्हा सर्वांची आहे असे सांगत काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष विशाल पाटील यांनी महाविकास आघाडीला अप्रत्यक्ष इशारा दिला. आशा व्यक्त केली असली तरीही त्यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.


# अखिलेश मिश्रांना पदावरुन हटवा!

## एखाद्या पक्षाच्या कार्यकर्त्याप्रमाणे काम करत असल्याचा आरोप

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**आयर्लंडमधील भारताचे राजदूत अखिलेश मिश्रा यांच्या एका प्रतिक्रियेवर काँग्रेसने तीव्र आक्षेप घेतला आहे. राजदूत अखिलेश मिश्रा यांनी एका आयरिश वृत्तपत्राला आपली प्रतिक्रिया दिली होती. त्यामध्ये त्यांनी विरोधी पक्षांवर टीका केली होती. यावरुन राजदूत हे एखाद्या पक्षाच्या कार्यकर्त्याप्रमाणे काम करत असल्याचा आरोप काँग्रेसकडून करण्यात आला. तसेच अखिलेश मिश्रा यांना त्यांच्या पदावरुन हटविण्याची मागणी काँग्रेसने केली.**



एका आयरिश वृत्तपत्रामध्ये भारतीय निवडणुकासंदर्भात एक लेख प्रसिद्ध झाला होता. यावर भारताचे आयर्लंडमधील राजदूत अखिलेश मिश्रा यांनी या वृत्तपत्राला आपली प्रतिक्रिया दिली होती. यामध्ये त्यांनी विरोधकांवर हल्ला केला होता. तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारचे कौतुक केले होते. यावर काँग्रेसने आक्षेप घेतला. यासंदर्भातील वृत्त इंडियन एक्सप्रेसने दिले आहे.काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनी या संदर्भात 'एक्स'वर पोस्ट करत आपली प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, "भारत सरकारचा बचाव करणे ही गोष्ट अपेक्षित आहे. मात्र, अशा प्रकारे विरोधी पक्षांवर हल्ला करणे हे एखाद्या पक्षप्रचारकाप्रमाणे राजदूताकडून अपेक्षित नाही. याचा अर्थ असा होतो की, एखाद्या राजकीय पक्षासाठी काम करणे. विरोधकांवर टीका करणे म्हणजे एखाद्या पक्षाचे कार्यकर्ते असल्यासारखे वागणे होय. पण एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याकडून हे अपेक्षित नाही", असे म्हणत जयराम रमेश यांनी आयर्लंडमधील राजदूत अखिलेश मिश्रा यांच्यावर पक्षपाताचा आरोप केला. तसेच त्यांना पदावरुन हटवण्याची मागणीही केली.एका आयरिश वृत्तपत्रामध्ये भारतीय निवडणुकांवर एक लेख लिहिला होता. या लेखामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निवडणुकीवर आपली पकड मजबूत केली आहे, अशा संदर्भाने लिहिले होते. यानंतर आयर्लंडमधील भारताचे राजदूत अखिलेश मिश्रा यांनी यावर प्रतिक्रिया देत पंतप्रधान मोदी यांची देशातील लोकप्रियता अभूतपूर्व असून भारताची लोकशाही मजबूत आहे, असे सांगत विरोधी पक्षावर टीका केली होती.

### जयराम रमेश काय म्हणाले?

» निवडणुकासंदर्भात एक लेख प्रसिद्ध झाला होता. यावर भारताचे आयर्लंडमधील राजदूत अखिलेश मिश्रा यांनी या वृत्तपत्राला आपली प्रतिक्रिया दिली होती. यामध्ये त्यांनी विरोधकांवर हल्ला केला होता. तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारचे कौतुक केले होते. यावर काँग्रेसने आक्षेप घेतला. यासंदर्भातील वृत इंडियन एक्सप्रेसने दिले आहे.काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनी या संदर्भात 'एक्स'वर पोस्ट करत आपली प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, "भारत सरकारचा बचाव करणे ही गोष्ट अपेक्षित आहे. मात्र, अशा प्रकारे विरोधी पक्षांवर हल्ला करणे हे एखाद्या पक्षप्रचारकाप्रमाणे राजदूताकडून अपेक्षित नाही. याचा अर्थ असा होतो की, एखाद्या राजकीय पक्षासाठी काम करणे. विरोधकांवर टीका करणे म्हणजे एखाद्या पक्षाचे कार्यकर्ते असल्यासारखे वागणे होय. पण एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याकडून हे अपेक्षित नाही", असे म्हणत जयराम रमेश यांनी आयर्लंडमधील राजदूत अखिलेश मिश्रा यांच्यावर पक्षपाताचा आरोप केला. तसेच त्यांना पदावरून हटवण्याची मागणीही केली.एका आयरिश वृत्तपत्रामध्ये भारतीय निवडणुकांवर एक लेख लिहिला होता. या लेखामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निवडणुकीवर आपली पकड मजबूत केली आहे, अशा संदर्भाने लिहिले होते.

---

# मतपेटीद्वारे गुप्त मतदानाच्या पर्यायावर सर्वोच्च टिप्पणी

## समस्या अधोरेखित करत घडयाळाचे काटे उलटे फिरवण्यावर आक्षेप

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**मतदानयंत्राबरोबर जोडलेल्या सर्व 'व्हीव्हीपॅट'चीही (कागदी मत पडताळणी) मोजणी करण्याच्या मागणीवरील सुनावणीदरम्यान मंगळवारी सर्वोच्च न्यायालयाने मतपेटीद्वारे गुप्त मतदानाच्या पर्यायामधील मानवी हाताळणीतील समस्या अधोरेखित करत घडयाळाचे काटे उलटे फिरवण्यावर आक्षेप नोंदवला.**



निवडणूक मतदानयंत्राद्वारे मतदाराने मत दिल्यानंतर 'व्हीव्हीपॅट' जोडलेल्या मशीनवर मताची कागदी पावतीही उपलब्ध होते. ही कागदी पावती मतदारांच्या हातात दिली जात नाही. मात्र, ही पद्धत बदलून कागदी पावती मतदारांना मतपेटीमध्ये टाकण्याची परवानगी दिली पाहिजे व मतमोजणीच्या दिवशी मतदानयंत्रे व कागदी पडताळणी एकाच वेळी झाली पाहिजे, असे मुद्दे 'असोसिएशन फॉर डेमोक्रेटिक रिफॉर्म' (एडीआरम) या संस्थेच्या वतीने ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण यांनी मांडले. लोकसभा निवडणुकीसाठी पहिल्या टप्प्यातील मतदान १९ एप्रिल रोजी होत असून 'व्हीव्हीपॅट'संदर्भातील न्या. संजीव खन्ना व न्या. दीपंकर गुप्ता यांच्या खंडपीठासमोर पुढील सुनावणी १८ एप्रिल रोजी होणार आहे.मतपेटीतील कागदी पावत्यांच्या मोजणीच्या भूषण यांच्या मुद्दयावर आक्षेप नोंदवत न्या. संजीव खन्ना यांनी, देशातील निवडणुकांमध्ये मतदानयंत्रांचा वापर होण्याआधी मतपेटीतील गुप्त मतदानपद्धतीत होणाऱ्या गैरप्रकारांचा पाढा वाचला. मतदान केंद्रांचा ताबा घेऊन बोगस मतदान कसे होत होते हे आम्ही विसरलो नाही, असे न्या. खन्ना म्हणाले. मतदानयंत्रामध्ये जाणीवपूर्वक फेरफार केले गेले तर, मतदान व मतमोजणीमध्ये समस्या निर्माण होऊ शकते. या मुद्द्यांच्या अनुषंगाने युक्तिवादावर भर देण्याची सूचना खंडपीठाने याचिकाकर्त्यांच्या वकिलांना केली. मतदानयंत्रांमध्ये फेरफार केला जाऊ शकतो, असा मुद्दाही भूषण यांनी मांडला. सलग दोन मते एकाच पक्षाला दिली गेली तर, 'व्हीव्हीपॅट'मध्येही फेरफार होऊ शकतो. एक मत एका पक्षाला तर दुसरे मत अन्य पक्षाला विभागले जाऊ शकते. मतदानयंत्रांच्या विश्वासार्हतेवर शंका घेता येते. ही मतदानयंत्रे 'ईसीआयएल' आणि 'भेल' या दोन सरकारी कंपन्या तयार करतात, या कंपनीमधील काही संचालक भाजपचे सदस्य आहेत, असा संदर्भ देत भूषण यांनी 'व्हीव्हीपॅट'मधील कागदी पावत्या मतदारांना मतदानपेटीमध्ये टाकण्याचे स्वातंत्र्य दिले पाहिजे, असा युक्तिवाद केला. मतदानयंत्रातील मत व मतपेटीतील कागदी मत एकाच वेळी मोजले गेले तर मतमोजणी निर्दोष होईल. लोकसभा निवडणूक सहा आठवडे घेतली जात असून मतमोजणीसाठी आणखी एक दिवस घेतला तर फारसे बिघडणार नाही, असे भूषण यांचे म्हणणे होते. आत्ता लोकसभा मतदारसंघातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघामधील फक्त ५ 'व्हीव्हीपॅट'ची मोजणी केली जाते. एकूण २ टक्के 'व्हीव्हीपॅट'ची मोजणी ही अत्यल्प ठरते.

### विद्यमान व्यवस्था कुचकामी करू नका

» त्यामुळे सर्व 'व्हीव्हीपॅट'ची मोजणी केली पाहिजे, असा मुद्दाही मांडण्यात आला. मतदानपेटीतील कागदी पावत्या मोजण्याच्या पर्यायावर न्या. खन्ना यांनी, मानवी हाताळणीमुळे मतमोजणीमध्ये समस्या निर्माण होऊ शकतात असे मत व्यक्त केले. पक्षपातीपणासारख्या मानवी दोषांमुळे मतदानयंत्र व मतपेटीतील कागदी मतांची मोजणी यांच्यातील आकडा वेगवेगळा असल्याचा धोका वाढतो. त्यामुळे मतदान व मतमोजणीच्या विश्वासार्हतेवर शंका घेतल्या जाऊ शकतात. मतदानयंत्रातील मतांची मोजणी मशीनद्वारे होत असल्यामुळे मतमोजणीतील मानवी हस्तक्षेप टाळला जातो, असे निरीक्षण न्या. खन्ना यांनी नोंदवले.

# परिणीती चोप्रा पोहोचली सिद्धिविनायकाच्या चरणी



अभिनेत्री परिणीती चोप्रा सध्या 'अमर सिंग चमकीला'चित्रपटामुळे चर्चेत आहे. १२ एप्रिल २०२४ रोजी हा चित्रपट नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाला. या चित्रपटात परिणीतीबरोबर दिलजीत दोसांझदेखील आहे. परिणीतीने अभिनयाबरोबरच गायन क्षेत्रातही नुकतचं पदार्पण केलं आहे. या चित्रपटात अभिनेत्रीने अनेक गाणी गायली आहेत. या चित्रपटासाठी अभिनेत्री खास सिद्धिविनायकाच्या दर्शनाला गेली आहे. परिणीतीचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होतोय. नुकताच प्रदर्शित झालेल्या 'अमर सिंग चमकीला' या चित्रपटासाठी परिणीतीने सिद्धिविनायक मंदिरात जाऊन बाप्पाचं दर्शन घेतलं. १७ एप्रिल रोजी रामनवमीच्या मुहूर्तावर परिणीती सिद्धिविनायकाच्या चरणी नतमस्तक झाली. या खास दिवसासाठी परिणीतीने सफेद रंगाचा स्लीवलेस ड्रेस परिधान केला होता. खुले केस, मिनिमल मेकअप ठेवत परिणीतीने हा लूक पूर्ण केला आहे. अभिनेत्री मंदिरातून बाहेर परतताना बाप्पाचा फोटो घेऊन जाताना दिसली.परतण्याआधी या चित्रपटासाठी आणि तिच्या भूमिकेसाठी दिलेल्या प्रेमाबद्दल तिने चाहत्यांचे आभार मानले. यादरम्यान अभिनेत्री म्हणाली, "खूप खूप धन्यवाद, तुम्ही लोकांनी 'अमर सिंग चमकीला'ला खूप प्रेम दिले आहे." परिणीतीने मुलांना लाडू वाटप केले.परिणीतीने पापाराझींना मिठाईदेखील वाटली. अभिनेत्रीचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होतोय. परिणीतीच्या या व्हिडीओवर चाहत्यांनी भरभरून कमेंट्स केल्या आहेत.इम्तियाज अलीने दिग्दर्शित केलेला बायोपिक 'अमर सिंग चमकीला' चित्रपट सध्या चर्चेत आहे. हा चित्रपट पंजाबमधील गायक अमर सिंग चमकीला यांच्या जीवनावर बेतलेला आहे. त्यांची गोळ्या झाडून २७ व्या वर्षी हत्या करण्यात आली होती. १२ एप्रिल रोजी प्रदर्शित झालेल्या या चित्रपटात दिलजीत दोसांझने अमर सिंग चमकीला तर परिणीती चोप्राने त्यांची पत्नी अमरजोतची भूमिका केली आहे.

# परिणीती चोप्राने नवऱ्याची केली गोड तक्रार

अभिनेत्री परिणीती चोप्रा आणि आम आदमी पक्षाचे खासदार राघव चड्ढांनी गेल्यावर्षी २४ सप्टेंबरला लग्नगाठ बांधली. उदयपूरमध्ये यांचा शाही विवाहसोहळा थाटामाटात पार पडला होता. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत परिणीतीने तिच्या लग्नाबद्दल भाष्य केलं आहे. बॉलीवूड हंमाला दिलेल्या मुलाखतीत परिणीतीने लग्नानंतर राजकारणातील घडामोडी फॉलो करण्यास सुरुवात केल्याचं सांगितलं. अभिनेत्री म्हणाली, "आता फॉलो करावंच लागेल ना...पण, माझी तक्रार अशी आहे की, राघव अजिबात मनोरंजन क्षेत्रातील घडामोडी फॉलो करत नाही. त्याला काय सुरू आहे हे माहितीच नसतं. बरीच गाणी त्याला माहिती आहेत. पण, अनेकदा ती गाणी माझ्या चित्रपटातील आहेत हे सुद्धा त्याला माहिती नसतं."अगदी खरं सांगायचं झालं, राघवला सिनेमातलं नी मला राजकारणातलं काहीही कळत नाही. त्यामुळे आम्ही नेहमी आमच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल गप्पा मारत असतो आणि मला वाटतं तेच सगळ्याच जास्त छान आहे. आता हळूहळू मला त्याच्या कामाबद्दल माहिती होतेय." असं परिणीतीने सांगितलं.राजकीय क्षेत्राशी निगडीत असलेल्या राघव चड्ढांबरोबर झालेल्या लग्नाबद्दल परिणीती सांगते, "इंडस्ट्रीशी संबंधित नसलेल्या व्यक्तीशी लग्न झालं ही खरंच खूप छान गोष्ट आहे. कारण, माझं वैयक्तिक जीवन हे चित्रपटसृष्टीपेक्षा फार वेगळं आहे. राघवमुळे माझं आयुष्य अधिक सामान्य आणि सुखकर झालं."दरम्यान, नुकताच परिणीतीचा अमर सिंग चमकिला चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला. यामध्ये तिच्याबरोबर अभिनेता दिलजीत दोसांझने प्रमुख भूमिका साकारली आहे.अभिनेत्री परिणीती चोप्रा आणि आम आदमी पक्षाचे खासदार राघव चड्ढांनी गेल्यावर्षी २४ सप्टेंबरला लग्नगाठ बांधली. उदयपूरमध्ये यांचा शाही विवाहसोहळा थाटामाटात पार पडला होता. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत परिणीतीने तिच्या लग्नाबद्दल भाष्य केलं आहे. बॉलीवूड हंमाला दिलेल्या मुलाखतीत परिणीतीने लग्नानंतर राजकारणातील घडामोडी फॉलो करण्यास सुरुवात केल्याचं सांगितलं. अभिनेत्री म्हणाली, "आता फॉलो करावंच लागेल ना...पण, माझी तक्रार अशी आहे की, राघव अजिबात मनोरंजन क्षेत्रातील घडामोडी फॉलो करत नाही. त्याला काय सुरू आहे हे माहितीच नसतं. बरीच गाणी त्याला माहिती आहेत. पण, अनेकदा ती गाणी माझ्या चित्रपटातील आहेत हे सुद्धा त्याला माहिती नसतं.



# दीपिका पदुकोण करतेय 'सिंघम अगेन

लवकरच आई होणारी अभिनेत्री दीपिका पदुकोण नुकतीच 'सिंघम अगेन'च्या सेटवर दिसली. 'गुड न्यूज' दिल्यानंतर पहिल्यांदाच दीपिकानं तिचं बेबी बंप दाखवलं. आगामी चित्रपटासाठी ॲक्शन सीक्वेन्सचं शूटिंग करण्यासाठी अभिनेत्री पोलिसांच्या गणवेशात सेटवर आली होती. याचे फोटोज सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. पोलिसांचे खाकी कपडे, केसांचा बन, डोळ्यांवर ग्लासेस अशा लूकमध्ये अभिनेत्री सेटवर सज्ज झाली होती. दीपिकाने एक सीन शूट केला; ज्यामध्ये गुंडांच्या पोशाखात अनेक पुरुष होते.हाय वेस्ट पॅन्ट आणि मोठा बेल्ट लावून अभिनेत्रीनं बेबी बंप लपवण्याचा प्रयत्न यात केला गेला आहे, असं दिसतंय. दीपिका पदुकोणच्या फॅन पेजेसवरून हे फोटोज शेअर झाले होते. या फोटोजमध्ये दीपिकाच्या फाईट सीनसपूर्वी अभिनेत्री दिग्दर्शक रोहित शेट्टी आणि स्टंट टीमच्या सदस्यांकडून सूचना घेताना दिसते आहे. दीपिका प्रेग्नंट असल्यानं तिच्या फायटिंगचे सीन ती करणार नसून, तिच्याऐवजी स्टंट्स करणारी दुसरी व्यक्ती असेल, अशी शक्यता वर्तवली जात आहे. शूटिंगच्या ठिकाणी दीपिकासारखेच कपडे आणि हेअरस्टाईल असणारी व्यक्ती तिथे उपस्थित होती. तेव्हा दीपिकाचं शूटींग सुरू होतं. 'सिंघम अगेन' चित्रपटाद्वारे दीपिका पहिल्यांदाच पोलिसाच्या भूमिकेत दिसणार ही भूमिका साकारत लेडी सिंघम म्हणून दीपिका रोहित शेट्टीच्या पोलिसी संघात सामील झाली आहे.सिंघम अगेन'चं चित्रीकरण गेल्या वर्षी हैदराबादमध्ये सुरू झालं. रोहित शेट्टी दिग्दर्शित 'सिंघम अगेन' १५ ऑगस्टला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# जान्हवी कपूरच्या 'उलझ'चा टीझर प्रदर्शित

धडक' चित्रपटाच्या माध्यमातून बॉलीवूडमध्ये पदार्पण करणारी श्रीदेवींची मुलगी अभिनेत्री जान्हवी कपूर विविधांगी भूमिका साकारताना दिसत आहे. तिने अल्पावधीत आपल्या अभिनयाने बॉलीवूडमध्ये एक वेगळं स्थान निर्माण केलं आहे. आता एका दमदार भूमिकेत जान्हवी कपूर प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. 'उलझ' असं तिच्या आगामी चित्रपटाचं नाव असून नुकताच चित्रपटाचा जबरदस्त टीझर प्रदर्शित झाला आहे. गेल्या वर्षभरापासून जान्हवी कपूर 'उलझ' चित्रपटाच्या चित्रीकरणासंदर्भात अपडेट देत होती. चित्रपटाचं चित्रीकरण संपल्यानंतर तिने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली होती.



# अदितीने दिल्या होणाऱ्या नवऱ्याला वाढदिवसाच्या शुभेच्छा

बॉलीवूडची अभिनेत्री अदिती राव हैदरीने सिद्धार्थशी लग्न केलंय, अशा चर्चा मध्यंतरी सुरू होत्या. पण, अदितीने स्वतःच एक फोटो शेअर करत त्यांचं लग्न नाही तर साखरपुडा झालाय हे सांगितलं. अदिती व सिद्धार्थ यांनी बुधवारी (२७ मार्च रोजी) तेलंगणातील वानापर्थी जिल्ह्यातील श्रीरंगापुरम इथं साखरपुडा केला. 'तो हो म्हणाला,' असं कॅप्शन देत अदितीने साखरपुड्याची गुड न्यूज सोशल मीडियावर शेअर केली.आज (१७ जानेवरी) अदितीच्या होणाऱ्या नवऱ्याचा वाढदिवस आहे. या खास दिवशी अदितीने आपल्या पतीला शुभेच्छा दिल्या आहेत. दोघांचे ब्लॅक ॲंड व्हाईट रोमँटिक फोटोज तिने सोशल मीडियावर शेअर केले आहेत. या फोटोजला कॅप्शन देत अदितीने लिहिलं, "वाढदिवसाच्या खूप शुभेच्छा. खूप सारं हास्य, आयुष्यभर आनंद. तू करत असलेल्या प्रत्येक गोष्टीसाठी तुला खूप बळ येऊ दे. तुझ्या आयुष्यभराच्या चीअरलीडरकडून तुला खूप साऱ्या शुभेच्छा आणि प्रेम."अदितीच्या या पोस्टवर अनेक चाहत्यांनी सिद्धार्थला शुभेच्छा दिल्या आहेत. एका मुलाखतीत अदिती आणि सिद्धार्थच्या लग्नाबद्दल विचारलं असता सिद्धार्थ म्हणाला होता की, "अदितीने मला होकार देण्यासाठी किती वेळ घेतला वगैरे हे प्रश्न आता दूर राहिले. मी खूप दिवस विचार करत होतो की, ही मला होकार कळवेल का? की नाही सांगेल. पण, सुदैवाने ती हो म्हणाली. आता आम्ही लग्न केव्हा करणार याचा निर्णय कुटुंबातील वरिष्ठ लोक घेतील. त्यांचा निर्णय आम्हा दोघांसाठी महत्त्वाचा असेल. ही काही चित्रपटाच्या शूटिंगची तारीख नाही की, मी ठरवेन तसं होईल. मोठ्या

# दिल्लीचा IPL मधील सर्वात मोठा विजय

## घरच्या मैदानावर गुजरातचा 6 विकेट्सनी उडवला धुव्वा

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**आयपीएलच्या १७व्या हंगामातील ३२वा सामना नरेंद्र मोदी स्टेडियम अहमदाबाद येथे पार पडला. या सामन्यात गुजरात टायटन्स आणि दिल्ली कॅपिटल्स आमनेसामने होते. ज्यामध्ये दिल्ली कॅपिटल्सने गुजरात टायटन्सवर ६ विकेट्सनी एकहाती विजय मिळवला. नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करायला उतरलेला गुजरातचा संघ दिल्लीच्या गोलंदाजांसमोर फलंदाजी करताना हतबल दिसला. ज्यामुळे गुजरात टायटन्सचा संघ १७.३ षटकांत ८९ धावांवर गारद झाला. प्रत्युत्तरात दिल्ली कॅपिटल्सने ८.५ षटकांत ४ बाद ९२ धावा करत विजयावर शिक्कामोर्तब केला. त्याचबरोबर दिल्ली कॅपिटल्सने चेंडूच्या बाबतीत आयपीएलमधील सर्वात मोठा विजय नोंदवला.**




स्पेन्सर जॉन्सनने संघाला पहिला धक्का दिला. त्यांनी मॅकगर्कची शिकार केली. त्याला दोन चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने २० धावा करता आल्या. तर शॉ केवळ सात धावा करू शकला. या सामन्यात अभिषेक पोरेलने १५, शाई होपने १९, ऋषभ पंतने १६ आणि सुमित कुमारने ९ धावा केल्या. पंत आणि सुमित नाबाद राहिले. गुजरातकडून संदीप वारियरने दोन विकेट्स घेतल्या. त्याचबरोबर स्पेन्सर जॉन्सन आणि राशिद खान यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.तत्पूर्वी नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेला गुजरातचा संघ दिल्लीच्या गोलंदाजांपुढे १७.३ षटकांत ८९ धावांवर गारद झाला. गुजरात टायटन्सच्या डावात ८ फलंदाजांना दुहेरी आकडाही गाठता आला नाही. साई सुदर्शनने १२ आणि राहुल तेवतियाने १० धावांचे योगदान दिले. १५ व्या षटकापर्यंत गुजरात टायटन्सची धावसंख्या ८ गड्यांच्या मोबदल्यात ७८ धावा होती. पण राशिद खान भक्कम भिंतीसारखा क्रीजवर उभा राहिला. मात्र, तो पण ३१ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. गुजरातच्या डावात षटकार ठोकणारा राशिद खान हा एकमेव फलंदाज होता. संथ खेळपट्टीवर झुंजत असताना, गुजरात टायटन्सचा डाव १८व्या षटकातच संपुष्टात आला, जेव्हा नूर अहमदला मुकेश कुमारने क्लीन बोल्ड केले.आयपीएल २०२४ मध्ये आतापर्यंत दिल्ली कॅपिटल्सच्या गोलंदाजांची खूप धुलाई झाली होती, परंतु जीटी विरुद्धच्या सामन्यात प्रत्येकाने शानदार कामगिरी केली. मुकेश कुमारने ३, इशांत शर्मा आणि ट्रिस्टन स्टब्सने २, तर खलील अहमद आणि अक्षर पटेल यांनी आपापल्या षटकात प्रत्येकी एक विकेट घेतली. कुलदीप यादवला एकही विकेट घेता आली नसली, तरी त्याने ४ षटकांत केवळ १६ धावा देऊन गुजरातच्या फलंदाजांना सतत दबावाखाली ठेवले. या तगड्या गोलंदाजीमुळे त्याने गुजरातला पूर्ण २० षटकेही खेळू दिली नाहीत.आयपीएलच्या १७व्या हंगामातील ३२वा सामना नरेंद्र मोदी स्टेडियम अहमदाबाद येथे पार पडला. या सामन्यात गुजरात टायटन्स आणि दिल्ली कॅपिटल्स आमनेसामने होते. ज्यामध्ये दिल्ली कॅपिटल्सने गुजरात टायटन्सवर ६ विकेट्सनी एकहाती विजय मिळवला. नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करायला उतरलेला गुजरातचा संघ दिल्लीच्या गोलंदाजांसमोर फलंदाजी करताना हतबल दिसला.

### पंत आणि सुमित नाबाद राहिले

» प्रत्युत्तरात दिल्ली कॅपिटल्सने ८.५ षटकांत ४ बाद ९२ धावा करत विजयावर शिक्कामोर्तब केला. त्याचबरोबर दिल्ली कॅपिटल्सने चेंडूच्या बाबतीत आयपीएलमधील सर्वात मोठा विजय नोंदवला.लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्लीची सुरुवात चांगली झाली. पृथ्वी शॉ आणि जॅक फ्रेझर-मॅकगर्क यांच्यात पहिल्या विकेटसाठी २५ धावांची भागीदारी झाली. स्पेन्सर जॉन्सनने संघाला पहिला धक्का दिला. त्यांनी मॅकगर्कची शिकार केली. त्याला दोन चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने २० धावा करता आल्या. तर शॉ केवळ सात धावा करू शकला. या सामन्यात अभिषेक पोरेलने १५, शाई होपने १९, ऋषभ पंतने १६ आणि सुमित कुमारने ९ धावा केल्या. पंत आणि सुमित नाबाद राहिले.

# जर हे शतक विराटने झळकावले असते तर

## बटलरच्या शतकावर हरभजन सिंगने सांगितली मोठी गोष्ट

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**राजस्थान रॉयल्सचा स्फोटक फलंदाज जोस बटलरने पुन्हा एकदा अशी कामगिरी केली आहे, जे प्रत्येक क्रिकेटरचे स्वप्न असते. केकेआरविरुद्ध खेळल्या गेलेल्या सामन्यात बटलरने शानदार शतक झळकावले आणि शेवटच्या चेंडूवर आपल्या संघाला विजय मिळवून दिला. हातातून निसटलेला विजय केकेआरच्या जबड्यातून हिसकावून घेताना बटलरने ६० चेंडूत ९ चौकार आणि ६ षटकारांसह नाबाद १०७ धावा केल्या. त्याच्या या स्फोटक खेळीची क्रिकेट वर्तुळात चर्चा होत आहे. बटलरच्या या शानदार खेळीवर अनुभवी गोलंदाज आणि समालोचक हरभजन सिंगने एक मोठं वक्तव्य केलं आहे.**





हरभजन सिंगने विराट कोहली आणि महेंद्रसिंग धोनीचे उदाहरण देत बटलरलाही भारतात असाच सन्मान मिळायला हवा, असे सांगितले. स्टार स्पोर्ट्सशी बोलताना हरभजन सिंग म्हणाला, “जर विराट कोहलीने हे शतक झळकावले असते, तर आम्ही ते दोन महिने त्याचे सेलिब्रेशन केले असते. जसे आपण धोनीच्या तीन षटकारांबद्दल बोलतो. त्याबरोबर आपण जसे आपल्या खेळाडू शतक झळकावल्यानंतर सेलिब्रेशन करतो, तसेच आपण हे शतकाचे सेलिब्रेशने केले पाहिजे. कारण बटलर हा दिग्गज खेळाडूंपैकी एक आहे. त्यामुळे त्याचाही सन्मान केला पाहिजे.”हरभजन सिंगने जोस बटलरच्या रेकॉर्डब्रेक शतकी खेळीचे कौतुक करताना म्हणाला की, “तो एक खास आणि वेगळ्या दर्जाचा खेळाडू आहे. त्याने असा पराक्रम करण्याची ही पहिलीच वेळ नाही. या अतुलनीय खेळाडूला अशी कामगिरी करताना आपण पुढेही पाहत राहू शकतो. परंतु आपण त्याच्याबद्दल जास्त बोलत नाही. कारण तो भारतीय खेळाडू नाही.”जोस बटलरने १०७ धावांची नाबाद खेळी साकारत आयपीएलमधील ७ वे शतक झळकावले, ज्यात त्याने ९ चौकार आणि ६ षटकार मारले. या काळात त्याचा स्ट्राइक रेट १७८.३३ होता. त्याचबरोबर या हंगामातील त्याचे हे दुसरे शतक आहे. या शतकासह बटलरने अनेक विक्रमही मोडीत काढले. बटलरने सर्वाधिक आयपीएल शतकांच्या बाबतीत ख्रिस गेलला मागे टाकले आहे. ख्रिस गेलने आयपीएलमध्ये ६ शतके झळकावली होती. विराट कोहलीनंतर बटलर दुसऱ्या क्रमांकावर आहे. कोहली हा आयपीएलमध्ये सर्वाधिक शतके करणारा फलंदाज आहे. आयपीएल २०२४ मध्ये झळकावलेल्या एका शतकासह, कोहलीने या लीगमध्ये आतापर्यंत ८ शतके झळकावली आहेत.

### राजस्थान गुणतालिकेत अव्वल

» राजस्थान रॉयल्स संघ आतापर्यंत आयपीएल २०२४ मधील ७ सामन्यांतील ६ विजयांच्या जोरावर १२ गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थानावर कायम आहे. त्याचवेळी, कोलकाता नाइट रायडर्स ६ सामन्यात ४ विजयांसह दुसऱ्या स्थानावर आहे. केकेआरचे ८ गुण आहेत. चेन्नई सुपर किंग्ज आणि सनरायझर्स हैदराबाद संघ अनुक्रमे तिसऱ्या आणि चौथ्या स्थानावर आहेत. दोघांच्या नावावर ६ सामन्यांत ४ विजय आहेत.